# के. के. वाघ संस्थेत विद्यार्थ्यांसाठी आज वारली चित्रशैली कार्यशाळा

प्रतिनिधी | नाशिक

के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अँड रिसर्च संस्थेतील प्रथम वर्ष बी. टेक.च्या विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारपासून (दि. १३) दोन दिवसांची वारली चित्रशैली परिचय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ११ ते दुपारी ४ पर्यंत आयोजित या कार्यशाळेत संजय देवधर मार्गदर्शन करणार आहेत. जगप्रसिद्ध वारली कलेचा इतिहास, पर्यावरणपूरक व निसर्गस्नेही वारली चित्रकलेची वैशिष्ट्ये, रेखांकन याविषयी माहिती देण्यात येईल. अशीच कार्यशाळा १९ व २० सप्टेंबर रोजीही होणार आहे , अशी माहिती प्राचार्य डॉ. के.एन. नांदूरकर यांनी दिली. कार्यशाळेत सुमारे एक हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. कार्यशाळेसाठी प्रा. ज्ञानेश्वरी पाटील, सुमन कहांडळ आदी पुढाकार घेत आहेत.

Divya marathi 13-09-2024